# के सेरा सेरा

Que sera sera
Whatever will be, will be
The future's not ours to see.
Doris Day ह्या गायिकेने गायलेले हे गीत. आल्फ्रेड हिचकॉकच्या 'The Man who knew too much' ह्या चित्रपटात Doris Day वर चित्रित झालेले हे गीत.
गाण्याचे शब्द जरा वेगळे वाटतात. Que Sera Sera चा अर्थ एखादी गोष्ट, आहे तशीच दैवावर सोडून त्या गोष्टीचा जास्त विचार करायचा नाही. भविष्य चांगलेच आहे आणि चांगलेच होईल ह्या भावनेने आजचा वर्तमानकाळ सुखाने आणि आनंदाने व्यतीत करायचा, असा साधा सरळ अर्थ. Que Sera Sera ही जणू phrase म्हणून प्रचलित झाली. जीवनाचं खूप मोठं आशावादी रहस्य, तत्वज्ञान अत्यंत साध्या सांगणार हे गाणं आहे. गाणं चित्रपटात पाहताना Doris Day च्या चेहऱ्यावरील हावभाव खूप छान, इतके बोलके की आपण समरस होऊन जातो.

Doris Day आपल्या लहानग्या मुलाची झोपायची तयारी करत असते, त्यावेळी ती आपल्या मुलाला हे गाणं ऐकवते, गाण्याचे शब्द खूप साधे सरळ आहेत. जीवनातील बाल्यावस्था, तारुण्यावस्था आणि सांसारिक जबाबदारीतील परिपक्व अवस्था ह्या तिन्ही अवस्थेत ती एकाच तत्वावर जगायचं ठरवते.

बाल्यावस्थेत तिने आईला विचारलेले असते,
When I was Just a Little girl
I asked my mother,
What I will be,
Will I be pretty, will I be rich,
त्यावेळी तिच्या आईने हेच उत्तर दिलेले असते,
Que Sera Sera,
Whatever will be, will be,
The future is not ours to see.
मोठी झाल्यावर, तारुण्यावस्थेत आपल्या प्रियकराला पुन्हा भविष्याबाबत तोच प्रश्न विचारते,
What lies ahead,
Will it be rainbow,
Day after day,

त्यावेळी पुन्हा तिचा प्रियकर हेच उत्तर देतो,
Que Sera Sera,
Whatever it will be, will be
Future's not ours to see.
आता विवाहानंतर परिपक्व जीवन जगताना, तिचे मुलं तिला पुन्हा प्रश्न करतात,
Willl I be handsome,
Will I be rich,
त्यावेळी पुन्हा शांतपणे ती मुलांना उत्तर देते,
Que Sera Sera,
Whatever wil be, will be
The future's not ours to see,
Que Sera Sera.
बाल्यावस्था, तारूण्य आणि वैवाहिक जीवन ह्या तिन्ही अवस्थेत जणू जीवनाचं एक वर्तुळ पूर्ण होतं, प्रश्न तोच आणि उत्तर तेच. अश्या आशादायक आणि जीवनाचं साधं सोपं तत्वज्ञान मांडणार हे गाणं.

माणूस हा आयुष्यभर उगाच चिंतेत जगत असतो, उद्या काय होईल ह्या अनाठायी  चिंतेपायी तो आजचं वर्तमानकाळातील सुखमय जीवन आणि आनंद नाकारत असतो. उद्या काय होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मात्र तरी भविष्याच्या अनाठायी काळजीच ओझं आपल्या खांद्यावर वाहत, माणूस आजचं जगणं जणू लाथाडत असतो. भविष्य हे अनाकलनीय आहे, त्याचा आज भरवसा देता येत नाही पण कदाचित आजचे आनंदाचे दिवस पुन्हा येतं नाही हे निश्चित. काळ हा वाहत्या नदीप्रमाणे आहे, नदीच्या पात्रात हात घातला तर स्पर्शाला जाणवणारे पाणी, हे काही कालांतराने पुन्हा स्पर्श केलेल्या पाण्यापेक्षा वेगळंच असणार. त्यामुळे आजचा वर्तमानकाळ जो आपण भोगणार, तो पुन्हा येणार नाही. आयुष्याच्या प्रत्येक कालखंडात आपल्याला भेटणारे लोक, आप्तजन, मित्र वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे त्यांच्यासोबतच क्षण मनमुरादपणे आणि आनंदाने जगलेच पाहिजे, तो वर्तमानकाळ आनंदाने घालवताना त्यावर भविष्यकाळाच्या काळजीची अनावश्यक सावली नसावी.

वर्तमानकाळ हा आपल्याला जगण्यासाठी दिलेली जणू अमूल्य देणगी आहे. Today is Gift, that's why called as 'Present'.

खरं तर आपण जगतो तो वर्तमानकाळ हा उद्याचा भूतकाळ असतो पण हाच वर्तमानकाळ हा उद्याच्या भविष्याचा पाया असू शकतो. आज व्यतीत केलेले सुखाचे आणि आनंदाचे क्षण, उद्याच्या भविष्याला जणू सोनेरी किनार लावू शकतात. हे सुखाचे क्षण पुढील काळासाठी जणू टॉनिक असू

शकते. त्यामुळे उगाच भविष्याचा बाऊ करण्यात काहीच अर्थ नाही. आज भविष्याचा बाऊ करत, भविष्याच्या काळजीने चिंतेत वेळ वाया घालवला तर भविष्य अंध:कारमय असेल कारण त्या चिंतेमुळे जगण्यातली मजा, आनंद गमावला जाऊ शकतो.

हिंदी चित्रपट ' घातक' मधील असेच एक छान motivational song आहे.
"सोचना क्या ? जो भी होगा देखा जायेगा.
कल के लिये आज को ना खोना.
आज फिर ये कल न आयेगा"

'जिंदगी मिले ना दोबारा' चित्रपटात एक प्रसंग आहे, कतरिना कैफ आणि हृतिक रोशन यांचा एक प्रसंग आहे. दोघे छान गवतावर झोपून निरभ्र आकाशाकडे पाहत निवांत गप्पा मारत असतात. कतरिना सहज विचारते, तुझा जीवनाचे उद्दिष्ट काय ? हृतिक म्हणतो चाळीस वर्षापर्यंत बेदम काम करायचं, खूप पैसे आणि प्रतिष्ठा मिळवायची, नंतर छान जीवन उपभोगायचं. त्यावर कतरिना सहज विचारते, "तुला काय माहीत तू चाळिशीपर्यंत जगशील ते ?" त्या वाक्याने हृतिक निरुत्तर होतो. हाच प्रसंग किती मोठा संदेश देऊन जातो. आजचा फक्त विचार करावा, उद्या काय भविष्यात लिहून ठेवलंय काय माहीत ?

जीवन जगण्याची मूल्ये आणि तत्वज्ञान सहजपणे चित्रपटातून परिवर्तित होत असतात त्यासाठी काही मोठी पुस्तके अथवा संदर्भ ग्रंथ वाचायची गरज नसते.

खरं तरं जगण्याचे असे काही क्लिष्ट तत्वज्ञान नाही, सहज सोप्या रीतीने जगायची रीत घालून दिलेली असते आणि इतरांच्या अनुभवातून ती जीवनशैली स्वीकारावी आणि आपल्या पद्धतीने विकसित करावी. प्रत्येकाचा काळ, त्या काळातील भेटलेली माणसं आणि प्राप्त परिस्थितीने माणूस घडत असतो. फक्त अश्या प्रत्येक वेळी उगाच परिस्थितीचा बाऊ न करता त्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणे आणि भविष्याचा अनाठायी विचार न करता, आजचा दिवस आनंदाने आणि सुखासमाधानाने व्यतीत करता आला पाहिजे.

**- मनोज कुरुंभटी**